आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या. ७.०० वा.

१६ मे, २०१२ - बुधवार

ठळक बातम्या

- आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या फी सवलतीसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपये करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय / टंचाईग्रस्त १५ तालुक्यांना कायमस्वरुपी उपाययोजनांसाठी प्रत्येकी १० कोटी रुपये देणार
- बाराव्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राचा विकासदर ४ टक्के राखण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल असा प्रधानमंत्र्यांना विश्वास
- एअर इंडियाच्या वैमानिकांचा संप नवव्या दिवशी कायम मात्र विस्कळीत आंतरराष्ट्रीय हवाई सेवा पुन्हा सुरु
- जागतिक बाजार पेठेतल्या अस्थिर वातावरणाचा शेअर बाजारावर परिणाम, निर्देशांकात २९८ अंकांची घसरण

||<><><>||

आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी फी-सवलत योजनेसाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १५ हजार रुपयांवरुन एक लाख रुपये करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्याबाबत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. राज्यातल्या टंचाईग्रस्त १५ तालुक्यांना प्रत्येकी १० कोटी रुपये कायम स्वरुपी उपाययोजनांसाठी देण्यात येणार असल्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामध्ये संगमनेर, जत, पलुस, खटाव, माण, मंगळवेढा, पारनेर, भूम, पूरंदर, आठपाडी, कवठे महांकाळ, खाणापूर, मिरज, तासगाव आणि सांगोले या तालुक्याचा समावेश आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार या अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात सुरु असून, वंचित आणि दुर्बल घटकातल्या बालकांना विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश देण्याचीही घोषणा त्यांनी केली. या २५ टक्के जागांपैकी ५० टक्के म्हणजे निम्या जागा सामाजिक आरक्षण म्हणून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग भरण्यात येतील आणि उरलेले ५० टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून प्राधान्यानं भरण्यात येतील. मात्र एका संवर्गामधून पुरेसे अर्ज प्राप्त झाले नाहीत, तर दुसऱ्या संवर्गातील मुलांमधून उर्वरित जागा भरण्यात येतील. तसंच मुलींना प्राधान्य देण्यात येईल.

केंद्र पुरस्कृत हातमाग उद्योगाचे पुनर्जीवन आणि सुधारणा योजनेत सहभागी होण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत घेण्यात आला. याअंतर्गत केंद्र सरकार आणि नाबार्ड यांच्या समवेत सामंजस्य करार करायला मान्यता देण्यात आली. यासाठी चालू आर्थिक वर्षात सुमारे २९ कोटी रुपये उपलब्ध करुन द्यायला मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

वन, सामाजिक वनीकरण विभाग आणि वन विकास महामंडळातल्या ६ हजार ५४६ रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना कायम करण्याचा निर्णयही आज घेण्यात आला.

<><><>

बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या अवधीत, कृषि क्षेत्राचा विकासदर ४ टक्के राखण्यासाठी, सरकार उपलब्ध साधनसामग्रीच्या जोरावर सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा ठाम विश्वास प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांनी व्यक्त केला. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ते आज बोलत होते. बाराव्या योजनेत ४ टक्के कृषी विकासदर गाठण्याचं उद्दिष्ट असून, योजना तयार झाल्यावर त्यावर सदनात विस्तृत चर्चा घेता येईल, असं ते म्हणाले.

११ व्या योजनेत हा दर ३ पूर्णांक ३ दशांश टक्के गाठता आला होता. देशातलं दारिद्रय हटवण्यासाठी तसंच शेतीवर अवलंबून असणाऱ्या मोठ्या वर्गाला दिलासा देण्यासाठी कृषि क्षेत्रात अधिकाधिक प्रयत्न होण्याची गरज आहे, असं नियोजन राज्यमंत्री अश्विनी कुमार यांनी सांगितलं.

<><><>

परभणी महानगरपालिकेच्या महापौरपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रताप देशमुख हे विजयी झाले. त्यांनी काँग्रेसचे भगवान वाघमारे यांचा ९ मतांनी पराभव केला. उपमहापौर पदासाठी झालेल्या मतदानात राष्ट्रवादी काँग्रेसचे सज्जूलाला यांनी काँग्रेसचे शिवाजी भरोसे यांचा पराभव केला.

<><><>

उस्मानाबाद जिल्ह्यातल्या परंडा तालुक्यातल्या सीना-कोळेगाव धरणातलं पाणी सोलापूर जिल्ह्यासाठी सीना नदीत सोडायच्या निर्णयाला सर्वपक्षीय नेत्यांनी विरोध केला आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी या धरणातलं एक टी.एम.सी.पाणी पिण्यासाठी सोडायचा निर्णय मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत झाला होता.

परंडा तालुक्यातल्या सर्वपक्षीय नेत्यांनी याबाबतचं निवेदन तहसीलदारांना आज दिलं. या अन्यायाविरुद्ध आंदोलन करायचा इशाराही त्यांनी दिला आहे.

<><><>

राज्यातल्या ज्या ग्रामीण भागात एस.टी.बस सेवा पोचू शकत नाही, तिथं मॅक्सी-कॅब चालू करण्याबाबत सरकार विचार करत आहे, अशी माहिती परिवहन राज्यमंत्री गुलाबराव देवकर यांनी दिली. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. एस.टी.बस सेवेमध्ये सुधारणा करणं गरजेचं असून, सध्या आम्ही मॅक्सी कॅबचा प्रयोग करुन पाहणार आहोत. यासाठी मदत आणि पुनर्वसन मंत्री पतंगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती स्थापन केली असून, ती याबाबत अभ्यास करेल, अशी माहितीही यावेळी देवकर यांनी दिली.

<><><>

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विस्तार महोत्सवाला अकोल्यात मोरगाव भाकरे इथं कालपासून सुरुवात झाली. जमिनीचा पोत सुधारणे, बीजप्रक्रिया, किसान कॉल सेंटर, पिक उत्पादन तंत्रज्ञान, पणन अधारित कृषि विस्तार कार्यक्रम, उत्पादक ते ग्राहक विक्रि पश्चात सेवा इत्यादि उपक्रम या कार्यक्रमादरम्यान राबवले जाणार आहेत. हा महोत्सव ३० मे पर्यंत चालणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, तसंच अकोला कृषि विज्ञान केंद्राचा यात सहभाग आहे.

<><><>

एअर इंडिया व्यवस्थापनानं विस्कळीत झालेली आंतरराष्ट्रीय हवाई सेवा आज पुन्हा सुरु केली. वैमानिक संपाच्या आजच्या नवव्या दिवशी एअर इंडियानं ही आपत्कालीन योजना जाहीर केली. ज्यादा प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी मोठया आकाराच्या विमानांची सोय करण्यात आली आहे. परिस्थिती पूर्वपदावर आली तर लगेचच तिकिट आरक्षण सुरु केलं जाईल, अशी माहिती एअर इंडियाच्या एका अधिकाऱ्यानं दिली. संपामुळे आरक्षण उदयापर्यंत स्थगित केल्याची घोषणा यापूर्वी करण्यात आली आहे.

दरम्यान व्यवस्थापनानं प्राथमिक स्तरावर चर्चा करायला आमंत्रित करावं, अशी मागणी इंडियन पायलट्स गिल्डनं आज केली. एअर इंडियाच्या सुमारे २०० हून जास्त वैमानिकांनी दाखल केलेल्या याचिकेवरचा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयानं आज राखून ठेवला. गेल्या ९ मे रोजी उच्च न्यायालयाच्या एक-सदस्यीय पीठानं वैमानिकांचा संप बेकायदेशीर ठरवून त्यांच्या संपावर बंदी घातली होती. या निर्णयाविरुद्ध वैमनिकांनी ही याचिका दाखल केली आहे. इंडियन पायलट्स गिल्डचं कार्यालय मुंबईत असल्यानं ते दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायक्षेत्रात येऊ शकत नाही. त्यामुळे वैमानिकांच्या संपाला हे न्यायालय प्रतिबंध करु शकत नाही, असं या याचिकेत म्हटलं आहे.

<><><>

रुपयाच्या मूल्यात झालेली आतापर्यंतची सर्वात मोठी घसरण आणि जागतिक बाजारपेठांमधल अस्थिर वातावरण यांचा परिणाम आज मुंबई शेअर बाजारावर चांगलाच जाणवला. त्यामुळे समभागांची विक्री मोठ्या प्रमाणावर झाली आणि परिणामी निर्देशांक २९८ पूर्णांक १६ शतांशांनी घसरुन १६ हजार ३० पूर्णांक ९ शतांश अंकांवर बंद झाला.

रुपयाचं मूल्य डॉलरसाठी ५४ रुपये ४६ पैसे इतकं कमी झाल्यानं आर्थिक मंदीची भीती परदेशी गुंतवणुकदारामध्ये होती, असं मत शेअस दलालांनी नोंदवलं.

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही ८४ पूर्णांक ५५ शतांशाची घट होऊन तो दिवसअखेर ४ हजार ८५८ पूर्णांक २५ शतांश अंकांवर स्थिरावला.

<><><>

जळगाव जिल्हयातल्या मुक्ताईनगर तालुक्यातल्या निमखेडी खुर्द इथे आज पहाटे ट्रेलरनं रिक्षाला दिलेल्या धडकेत १० जण जागीच ठार, तर अकरा जण जखमी झाले. त्यापैकी सहा गंभीर जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार चालू आहेत. हे भाविक मुक्ताबाईचे दर्शन घेऊन परतत असताना ही दुर्घटना घडली.

<><><>

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी जिल्ह्यात हातखंब्याजवळ आज सकाळी झालेल्या तिहेरी अपघातात एका बालिकेचा मृत्यू झाला, तर १६ जण जखमी झाले. रत्नागिरीतून मुंबईकडे जाणारी मोटार आणि मुंबईहून लांज्याकडे जाणारी जीप यांच्यात समोरासमोर टक्कर झाली. त्यानंतर अपघातातली मोटार रस्त्याच्या बाजुला उभ्या असलेल्या टेंपोवर आदळली. अडीच वर्षाच्या एका बालीकेला गंभीर जखमी अवस्थेत रत्नागिरीच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. उपचारादरम्यान तिचं निधन झालं, असं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

<><><>

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११चं चौपदरीकरण केलं जाणार असून, यासाठी लहानमोठी साडे-आठ हजार झाडं तोडली जाणार आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तोडलेल्या झाडांच्या मोबदल्यात ९ हजार झाडं नव्यानं लावण्यात येणार असल्याची माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी पी.डी.जोशी यांनी दिली. पर्यावरणविषयक जनसुनावणी कार्यक्रमात ते बोलत होते. या रुंदीकरणाचा फटका महामार्गावरच्या ३५ गावांना बसणार असल्यामुळे गावकऱ्यानी पर्यायी जागेची किंवा मावेजाची मागणी केली आहे.

<><><>

येत्या २ दिवसात उत्तर मध्य महाराष्ट्रात काही तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयात हवामान मुख्यत्वेकडून कोरडं राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. याच काळात विदर्भात हवामान कोरडं राहील असं नागपूरच्या हवामानखात्यानं कळवलं आहे.

||<><><>||

आय.पी.एल.मधल्या कथित स्पॉट फिक्सिंग प्रकरणी बी.सी.सी.आय.अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं केवळ त्या पाच खेळाडूंना निलंबित न करता समस्येच्या मूळापर्यंत जावं, असं मत क्रीडा मंत्री अजय माकन यांनी व्यक्त केलं. ते आज नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलत होते. बी.सी.सी.आय. या मूळ संघटनेपासून आय.पी.एल.ला वेगळं करणं जरुर असल्याचंही ते म्हणाले.

राजकारणी लोकांनी खेळापासून लांब रहावं आणि खेळांमधल्या तज्ञ आणि अधिकारी व्यक्तींच्या हातातच खेळाची सूत्रं असावीत, असं मतही यावेळी माकन यांनी व्यक्त केलं.

दरम्यान, आय.पी.एल.मधल्या कथित मॅच फिक्सिंग किंवा स्पॉट फिक्सिंग प्रकरणी जर कायद्याचं उल्लंघन झालं असेल, तर त्यावर कारवाई केली जाईल, असं आश्वासन संसदीय कामकाज मंत्री पवन कुमार बन्सल यांनी आज लोकसभेत दिलं.

<><><>

रुपयाची घसरण थांबवण्यासाठी रिझर्व्ह बँक हस्तक्षेप करणार नाही. मात्र रुपयाच्या दरात चढउतार होत असतील तरच आम्ही हस्तक्षेप करतो. असं रिझर्व्ह बँकेचे डेप्यूटी गव्हर्नर के.सी.चक्रवर्ती यांनी आज स्पष्ट केलं. रुपयानं आज प्रति डॉलर ५४ पूर्णांक ४६ शतांश असा आजवरचा नीचांक गाठला. या पार्श्वभूमीवर वार्ताहरांनी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिलं.

<><><>

मुंबई विद्यापीठाअंतर्गत असणारी महाविद्यालयं उन्हाळी सुट्टीनंतर येत्या ११ जून पासून सुरु होतील, अशी घोषणा कुलगुरु डॉ.राजन वेळुकर यांनी केली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष नियोजन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला सर्व विभागांचे प्रमुख आणि मुख्याध्यापक हजर होते.

तिन्ही विभागांच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया, परीक्षा संबंधी बाबी प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या शुल्कात वाढ करणं, शैक्षणिक शुल्क निश्चितीसाठी उप-समिती नेमणं, पूर्ण वेळ मुख्याध्यापक नेमणं यासारख्या महत्वाच्या मुद्यांवर ही यावेळी निर्णय घेण्यात आले. सर्व विषयांसाठी विद्यापीठातर्फे 'प्रश्नावली' उपलब्ध करुन देण्याची घोषणा ही प्र-कुलगुरु डॉ.नरेश चंद्र यांनी केली.

<><><>

देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे घाबरण्याची गरज नाही, असं अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी राज्यसभेत सांगितलं. राज्यसभेत आज वर्ष २०१२-१३ चा अर्थसंकल्प मंजूर झाला. त्यानंतर त्यावरच्या चर्चेत ते बोलत होते. जागतिक बाजारातल्या मंदीला, युरोपीय आर्थिक संकट आणि अन्य आंतरराष्ट्रीय कारणं जबाबदार आहेत. केवळ भारतच नाही, तर संपूर्ण आशिया खंड आणि इतर देशही या मंदीच्या फेऱ्यात आले आहेत. अनेक ठिकाणी अनिश्चिततेचं वातावरण आहे, पण म्हणून भीतीचं काही कारण नाही. सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, असं मुखर्जी म्हणाले.

नेपाळ विमान दुर्घटनेत १३ भारतीयांसह १५ जण मृत्यूमुखी पडल्याबद्दल राज्यसभेत आज शोक व्यक्त करण्यात आला. सदनाचं कामकाज सुरु होण्यापूर्वी सभापती हामिद अन्सारी यांनी ही दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचं सांगितलं. त्यानंतर, सदस्यांनी मौन पाळून मृतांना श्रद्धांजली वाहिली.

<><><>

सचिन तेंडूलकरला राज्यसभा सदस्यत्वाची शपथ न देण्याबाबतची जनहित याचिका आज दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली. राज्यसभेच्या नामांकनामध्ये कला, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रांचा समावेश आहे; आणि सचिन क्रीडाक्षेत्राशी संबंधित असल्यानं, नियमानुसार तो अपात्र आहे म्हणून नामांकन रद्द करावं असं याचिकेत म्हटलं होतं. याचिका फेटाळतानाच, ४ जुलैला केंद्र सरकारनं यासंदर्भात उत्तर द्यावं, असे निर्देश कार्यवाहक मुख्य न्यायाधिश ए.के. सिकरी आणि न्यायमूर्ती राजीव सहाय एंडला यांनी दिले आहेत.

<><><>

जागतिक बाजारातल्या मंदिच्या पार्श्वभूमीवर, व्यापाऱ्यांनी मोठया प्रमाणात विक्री केल्यामुळे दिल्ली सराफा बाजारात सोन्याच्या दरात आज आणखी १०० रुपयांची घसरण होऊन तो १० ग्रॅमसाठी २८ हजार ४४० इतका झाला. गेल्या ५ आठवडयातला हा नीचांक आहे. तसचं चांदीचा भाव आज ८०० रुपयांनी कमी होऊन तो प्रतिकिलो ५२ हजार ३०० रुपये इतका झाला. मुंबई सराफा बाजारात आज प्रमाणित सोन्याचा दर प्रति दहा ग्रॅम २७ हजार ९४० रुपये तर चांदीचा भाव प्रति किलो ५२ हजार ४४० रुपये इतका नोंदवला गेला.

<><><>